पुण्य नगरी पु.पा.नं. ३

# वसई–विरार समुद्रकिनारी गावठी दारूची विक्री?

**विरार ।** वसई-विरारमधील समुद्रकिनारी अनधिकृत हॉटेल आणि रिसॉर्ट झाल्याने या ठिकाणी अनेक गैरधंद्यांना पोषक वातावरण निर्माण होत आहे. त्यात आता या सागरीकिनारी मोठ्या प्रमाणात गावठी दारू विकली जात असल्याचे समोर आले आहे. गावठी दारू खुलेआम विकली जात असताना पोलिसांकडून कोणतीही कारवाई केली जात नसल्याने दारू माफिया या परिसरात मोठ्या प्रमाणात आपले साम्राज्य निर्माण करत आहेत.

वसई-विरारमधील सागरीकिनाऱ्यावर मोठ्या प्रमाणात बेकायदेशीररित्या दारू विकली जात आहे. काही महिन्यांपूर्वी येथे राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून मोठ्या प्रमाणात कारवाई करण्यात आली होती. असे असतानाही पुन्हा या परिसरात दारू माफिया सक्रिय झाले असून, अनेक ठिकाणी गावठी दारूचे गुत्थे बनवले आहेत. पोलिसांच्या नाकावर टिच्चून खुलेआम गावठी दारूची विक्री केली जात असल्याचे सूत्रांनी सांगितले. दरम्यान, अर्नाळा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक कल्याणराव करपे यांनी या संदर्भात माहिती मिळाली असून, पोलिसांमार्फत पाहणी करून कारवाई केली असल्याचे सांगितले.

लोकमत पु.पा.नं.३

## भाजप, काँग्रेसचे भाईंदरमध्ये आंदोलन

**मीरा रोड :** भाईंदर पश्चिमेला भाजप जिल्हा कार्यालयाबाहेर जिल्हाध्यक्ष ॲड.रवी व्यास यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्याविरुद्ध आंदोलन करण्यात आले. दरम्यान, मीरा-भाईंदरमध्ये युवक काँग्रेसने आंदोलन केले. त्यांनी मेट्रोचे काम चालू असलेल्या खांबांवर काळ्या अक्षरात निषेध करणारी, तसेच गांधी यांचे समर्थन करणारी वाक्ये लिहिली. भाजपचे सरकार लोकशाहीचा गळा दाबण्याचे काम करत असल्याचा आरोप यावेळी करण्यात आला.

पुढारी पा.नं.२

# घोडबंदर येथे वीजचोरी करणाऱ्यावर गुन्हा दाखल

**मिरा रोड :** काशिमिरा पोलीस ठाणे हद्दीतील घोडबंदर येथे घरात वीजचोरी करून वापरत असल्याचे आढळून आल्याने काशिमिरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

घोडबंदर येथे विजेची चोरी होत असल्याने त्याची तपासणी करण्यासाठी अदानी इलेक्ट्रीकसीटी दक्षता विभागाचे मोहित गुल्हाने हे गेले होते. त्यावेळी त्यांनी अमृतेश्वर शंकर मंदिर कंपाऊंडजवळ असलेल्या घरासाठी वापर होत असलेल्या विद्युत पुरवठ्याची तपासणी केली असता, अदाणी इलेक्ट्रीकसिटी कंपनीच्या मिटर केबिनमधून विजेची थेट जोडणी करून विज चोरी होत असल्याचे दिसून आले. तेथे घराचे वीज मीटर नसून अदाणी कंपनीच्या सर्विस कटआउट मधून अनधिकृतरित्या जोडणी करून थेट विद्युत पुरवठा घेतला होता. त्यांच्याजवळ वीज बिलाबाबत चौकशी केली असता त्या घराचे वीज बिल त्यांच्याजवळ नव्हते. तेथे जवळपास दोन वर्षांपासून चोरून वीज वापरत असल्याचे तपासातून उघडकीस आले. त्यांनी जवळपास १,६५,६९१ रुपयांची वीज वापरली असल्याचे स्पष्ट झाले.

लोकमत पु.पा.नं.२

## शैलेश पांडे यांना समाजगौरव

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** श्रीराम जन्मभूमी मंदिर निर्माण न्यास तसेच शिवसेना ठाकरे गटाचे राष्ट्रीय प्रवक्ता शैलेश पांडे यांना आनंद चॅरिटेबल ट्रस्टने उत्तर भारतीय समाजगौरव सन्मान पुरस्कार देण्यात आला.

खासदार राजन विचारे यांच्या हस्ते ठाणे येथील चैत्र नवरात्री उत्सव कार्यक्रमात पांडे यांना पुरस्कार देण्यात आला. पांडे हे ३० वर्षांपासून सामाजिक, कामगार आणि राजकीय क्षेत्रात कार्यरत आहेत. त्यांच्या पत्नी स्नेहा या दोनवेळा भाईंदरच्या नगरसेविका राहिल्या आहेत.

CamScanner
Scanned with CamScanner

पुढारी पा. न. ५

# बनावट कागदपत्रे बनवून वाहन खरेदी

## दोघा आरोपींना अटक



मिरा रोड : पुढारी वृत्तसेवा

विरार पोलीस ठाणे हद्दीत वेगवेगळ्या इसमांच्या नावाने बनावट कागदपत्रे बनवून त्यांच्या नावावर विविध बँकेतून कर्ज घेऊन मोटारसायकल खरेदी करणाऱ्या आरोपींना गुन्हे शाखेने अटक केली आहे. त्यांच्याकडून ६ लाख ३० हजार रुपये किंमतीच्या विविध कंपनीच्या ९ मोटारसायकल जप्त केल्या आहेत.

विरार पोलीस ठाणे हद्दीत राहणारे बाबसाहेब ओव्हाळ यांच्या नावाचे अज्ञात आरोपी यांनी बनावट पॅनकार्ड, अधारकार्ड बनवुन त्याद्वारे त्यांच्या नावावर २१ डिसेंबर ते ११ फेब्रुवारी २०२३ पर्यंत मूथुट फिनकार्प, एस. आय. क्रेवा कॅपीटल, आय. डी. एफ.सी. फस्ट बँक, कोटक प्राईम फायनान्स, एल. एन. टी. फायनान्स, मास फायनान्स या विविध फायनान्स कंपन्यामधुन ५,२१,५८३ रुपये कर्ज काढून फसवणुक केली. तसेच कर्ज देणाऱ्या फायनान्स कंपनी यांनी फिर्यादी यांच्या पॅनकार्ड व आधारकार्डची खात्री न करता कर्ज देवुन फिर्यादी यांची फसवणुक केली. याबाबत विरार पोलीस ठाण्यात विविध कलमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्हा दाखल झाल्यानंतर तपास गुन्हे शाखा कक्ष ३ विरार यांनी सुरु केला. तपास करत असताना गुन्ह्यातील आरोपी यांनी स्वतःची ओळख लपवण्यासाठी खोटे नाव व पत्ते वापरल्याने त्यांचा शोध घेणे अवघड झाले होते. गुन्हे शाखा कक्ष ३, विरारचे अधिकारी व अंमलदार यांनी सतत पाठपुरावा करून आरोपीची माहिती मिळवून आरोपी संजय परब, मोहम्मद बोहरा यांना ताब्यात घेवुन तपास केला असता संगणमत करुन गुन्हा केल्याचे सांगितले. अधिक तपास करुन त्यांनी वेगवेगळ्या इसमांच्या नावे बनावट कागदपत्रांचा वापर करुन विविध फायनान्स कंपन्यामधुन कर्ज घेवुन ६ लाख ३० हजारांच्या ९ मोटारसायकल घेतल्या होत्या.

पुढारी पा. न. ६

# एव्हरशाईन सिटीत मद्यपींचा धूडगूस

नालासोपारा : वसई पूर्वेच्या एव्हरशाईन सिटी येथे चक्क खुले मद्यालय सुरू असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. भरवस्तीत असलेल्या बिअरबारसमोर खुलेआम मद्यविक्री केली जात आहे. याकडे पोलीस तसेच राज्य उत्पादन शुल्क विभागाने दुर्लक्ष केल्याचा आरोप होत आहे. या मद्यपींमुळे परिसरातील सर्वसामान्य नागरिकांना विविध त्रासाला सामोरे जावे लागत आहे. वसई पूर्वेला एव्हरशाईन सिटी वसंत नगरी हा गजबजलेला निवासी वसाहतींचा परिसर आहे. या ठिकाणी शाळा, क्लासेस, बाजारपेठ आहे. त्यामुळे लहान मुले, विद्यार्थी आणि महिलांची गर्दी असते. याच गजबजलेल्या परिसरात एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. हा परिसर मद्यपींचा अड्डा बनू लागला आहे. संध्याकाळच्या वेळी मद्यपी या बारच्या आवारात बसून मद्यपान करत असतात. ते उघड्यावर मद्यपान आणि धूम्रपान करत असल्यामुळे त्याचा धूर आणि वासाचा नागरिकांना त्रास होत आहे. मात्र भीतीपोटी ते तक्रार करायला धजावत आहेत. हा परिसर माणिकपूर पोलिसांच्या अखत्यारित येतो. तरी देखील पोलिसांचे त्याकडे सोयीस्कर दुर्लक्ष होत आहे. या मद्यपींना लागणारा चखणा देण्यासाठी हातगाड्या देखील लागलेल्या आहेत. इतका गैरप्रकार माणिकपूर पोलिसांच्या देखत होत असल्याचा आरोप स्थानिक माजी नगर सेवक किरण भोईर यांनी आहे. दिवाण मार्केट परिसरात मद्यपी खुलेआम मद्यपान करत असल्याने तेथे येणाऱ्या सर्वसामान्य नागरिक, विद्यार्थी आणि महिलांना त्रास होत असतो. मद्यपींच्या नजरा आणि अश्लील शेरेबाजींना सामोरे जावे लागत आहे.

लोकमत पु. पा. न. १

# आरोपीला जामीन

मीरा रोड : भाईंदरच्या उत्तन-पालखाडी भागात पिंजऱ्यात सापडलेल्या बिबट्या तसेच दोन जंगली डुक्करांची वन विभागाने शुक्रवारी सुटका केली होती. याप्रकरणी अटक केलेल्या डॅनी घोन्साल्विस याला शनिवारी ठाणे न्यायालयाने जामीन मंजूर केला. शनिवारी ठाणे न्यायालयात वन विभाग ठाणेच्या सहायक वनसंरक्षक गिरिजा देसाई उपस्थित होत्या. वन विभागाने आरोपीची पाच दिवसांची कोठडी मागितली होती. मात्र, ती अमान्य करून न्यायालयाने डॅनी याला जामीन मंजूर करण्यात आला आहे.

CamScanner
Scanned with CamScanner

लोकमत पु. पा. नं. १

# कर्नाटकच्या मासेमारी बोटींवर कारवाई करा

## मत्स्य विभागाने दिले कोस्टगार्डला पत्र

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : अखिल महाराष्ट्र मच्छीमार कृती समितीच्या मागणीनंतर मत्स्य व्यवसाय विभागाच्या आयुक्तांनी कोस्टगार्डला पत्र पाठवून बेकायदा मासेमारी करणाऱ्या एलईडी व पर्ससीनसह कर्नाटकच्या घुसखोर बोटींवर कारवाई करण्यासाठी सहकार्य मागितले आहे.

अखिल महाराष्ट्र मच्छीमार कृती समितीचे अध्यक्ष देवेंद्र तांडेल, कार्याध्यक्ष बर्नड डिमेलो, सचिव संजय कोळी, सिंधुदुर्ग अध्यक्ष मिथुन मालंडकर, रत्नागिरी अध्यक्ष खलील वस्ता व इतर पदाधिकाऱ्यांनी कोकण किनारपट्टीवरील मच्छीमार बंदरांचा दौरा केला होता. कर्नाटक राज्यातील मोठमोठ्या बोटी घोळक्याने महाराष्ट्राच्या सिंधुदुर्ग हद्दीत येऊन बेकायदा मासेमारी करत आहेत. त्याबाबतच्या तक्रारी कृती समितीने मत्स्यव्यवसाय आयुक्त अतुल पाटणे यांच्याकडे सातत्याने केल्या होत्या.

### पारंपरिक मच्छीमारांना केला जातो मज्जाव

सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड, मुंबई, उपनगर, ठाणे, पालघर ह्या सर्व जिल्ह्यांमध्ये पर्ससीन व एलईडी पद्धतीने मासेमारी करणाऱ्या बोटींना डिसेंबर ते मे महिन्यात बंदी असताना १२ नॉटीकलच्या आतील क्षेत्रात ते बेकायदा मासेमारी करतात. हे बोटवाले स्थानिक मच्छीमारांना मात्र दादागिरी करून मासेमारी करण्यास मज्जाव करीत आहेत.

त्यानंतर काही प्रमाणात कारवाईला सुरुवात झाली. मात्र मत्स्य विभागाकडे कारवाई करण्यास पुरेशी यंत्रणा नसल्याने अडचण होत असल्याचे सातत्याने सांगण्यात येत होते. आयुक्त पाटणे यांनी कृती समितीची मागणी मान्य करत कोस्टगार्डला लेखी पत्र देऊन मत्स्य विभागास सहकार्य करण्यास सांगितले आहे, अशी माहिती बर्नड डिमेलो यांनी दिली.

सकाळ पु. पा. नं. २

# ‘निसर्गाला मारक असणारे प्रकल्प तातडीने थांबवा’

विरार, ता. २५ (बातमीदार) : वसई-विरार पालिका प्रशासनाने निसर्गाला मारक असलेले प्रकल्प तातडीने थांबवावेत. ते प्रकल्प इतरत्र हलवावेत, अशी सूचना हरित वसई चळवळीचे नेते व ज्येष्ठ पर्यावरणतज्ज्ञ मार्कुस डाबरे यांनी पालिकेला केली आहे. महापालिकेच्या प्रस्तावित सांडपाणी प्रकल्पाविरोधात गोखिवरे ग्रामस्थांनी विरोध करण्यास सुरुवात केली आहे.

पालिकेचा प्रस्तावित सांडपाणी प्रकल्प गोखिवरे येथे सुरू करण्यात येणार असल्याच्या बातमीने गोखिवरे ग्रामस्थ नाराज झाले आहेत. हा प्रकल्प गोखिवरे गावात येता कामा नये यासाठी ग्रामस्थांनी कंबर कसली आहे. गोखिवरे परिसर हा शेतिप्रधान असून येथील शेकडो एकर जमीन ही वनक्षेत्र म्हणून राखीव आहे. गोखिवरे गावाजवळच राजावली, पेल्हार, बापाणे आदी शेतिप्रधान गावे आहेत. त्यामुळे हा प्रकल्प गोखिवरे येथून इतरत्र हलवण्यात यावा, अशी मागणी ग्रामस्थांनी अनिलकुमार पवार यांना पत्राद्वारे केली आहे.

सामना पा. नं. १.

**पितळ उघडे पडेल याची मोदींना भीती म्हणून माझी खासदारकी रद्द केली**

# अदानींच्या बोगस कंपन्यांमधील २० हजार कोटी कुणाचे?

नवी दिल्ली, दि. २५ (वृत्तसंस्था) – पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि उद्योगपती गौतम अदानी यांचे घनिष्ठ संबंध आहेत. अदानींच्या शेल (बोगस) कंपन्यांमध्ये २० हजार कोटींची गुंतवणूक कोणी केली? हे पैसे कोणाचे आहेत? हा पैसा कोठून आला? अशी प्रश्नांची सरबत्ती करीत काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी जोरदार हल्लाबोल केला. आपले पितळ उघडे पडेल याची भीती पंतप्रधान मोदींना आणि भाजपला वाटते. त्यामुळेच माझी खासदारकी रद्द केली; मात्र, आयुष्यभरासाठी खासदारकी रद्द केली किंवा धमक्या दिल्या तरी मी घाबरणार नाही, माफी मागणार नाही, गुडघे टेकणार नाही. मी प्रश्न विचारणारच, असा निर्धारही राहुल गांधींनी व्यक्त केला.

▪ पान ३



राहुल गांधी यांचा हल्लाबोल

### ओबीसींना पुढे करून भाजपकडून मुद्दा भरकटवण्याचा प्रयत्न

सर्व चोर मोदी आडनावाचे कसे असतात? असे विधान राहुल गांधींनी केले होते. ओबीसींचा अपमान केला, असा आरोप भाजप करत आहे. यावर राहुल गांधी म्हणाले, मी 'भारत जोडो' यात्रेवेळी सर्व समाजघटकांना सोबत घेऊन चाललो. सर्वच समाजाचे लोक सहभागी झाले होते. याकडे लक्ष वेधत राहुल गांधी म्हणाले, मुळात हा ओबीसींचा विषयच नाही. हा अदानी आणि मोदींच्या संबंधाचा विषय आहे. ओबीसींना पुढे करत भाजप मुख्य मुद्दा भरकटवण्याचा प्रयत्न करत आहे.

CamScanner

Scanned with CamScanner

सकाळ पु. पा. नं. १



# ऑनड्युटी

# खाकी वर्दीमागे दडलंय संवेदनशील मन

प्रकाश लिमये, भाईंदर

**खाकी वर्दीमागे संवेदनशील मन दडलेले असते. याचे उदाहरण म्हणजे मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलिसांच्या भरोसा सेलच्या सहायक पोलिस निरीक्षक तेजश्री शिंदे. कर्तव्य बजावत असतानाच समाजमाध्यमावर कविता, लेख अशी त्यांची साहित्यिक मुशाफिरीही सुरू असते.**

तेजश्री शिंदे यांचे महाविद्यालयीन शिक्षण मुंबईतच झाले. एम.ए.साठी निवडलेल्या मराठी साहित्य या विषयात मुंबई विद्यापीठात त्या अव्वल ठरल्या. गेली दहा वर्षे त्या पोलिस सेवेत कार्यरत असून गेल्या दीड वर्षापासून भरोसा सेलच्या माध्यमातून त्या मोडकळीस आलेली कौटुंबिक नाती सावरण्याचे काम करत आहेत. शालेय जीवनापासूनच तेजश्री शिंदे यांचा कला, साहित्याकडे ओढा होता. महाविद्यालयात कला शाखेत प्रवेश घेतल्यानंतर प्राध्यापक नितीन दिंडे यांच्यामुळे त्यांना वाचनाची गोडी लागली. त्यांनी वाचलेले पहिले साहित्य म्हणजे प्रसिद्ध लेखक भालचंद्र नेमाडे यांचे कोसला ही कादंबरी. त्याच काळात त्यांना प्रत्यक्ष नेमाडे यांच्याशी संवादही साधता आला. त्यानंतरच साहित्यात खरी रुची निर्माण झाली व एम.ए. मराठी साहित्य या विषयात करण्याचा निर्णय त्यांनी घेतला. शिक्षण घेत असताना अनेक साहित्य संमेलनालाही त्यांनी हजेरी लावली. याचा परिपाक म्हणून त्यांच्यातील साहित्यिक हळुहळू घडत गेला.



तेजश्री शिंदे,
सहायक पोलिस निरीक्षक

तेजश्री शिंदे यांचा पोलिस सेवेत दाखल झाल्यानंतर साहित्याशी संपर्क काहीसा कमी झाला. मात्र साहित्याची ऊर्मी काही स्वस्थ बसू देत नव्हती. पोलिस सेवेत असताना विशेष करून भरोसा सेलमध्ये काम करताना त्यांचा अनेक महिलांशी संपर्क आला, त्यांचे दुःख, समस्या जवळून पाहता आल्या. त्यातून स्त्री केंद्रित साहित्याचे लिखाण त्यांच्या हातून होऊ लागले. महिलांचे दुःख त्यातून प्रतिबिंबित होऊ लागले.

आतापर्यंत शेकडो कविता लिहून झाल्या आहेत. त्यांचा पुस्तकरूपी कवितासंग्रह प्रसिद्ध करायचा आहे. तसेच महिलांच्या समस्यांवरही लिखाण करायचे आहे.

- तेजश्री शिंदे, सहायक पोलिस निरीक्षक

## समाजमाध्यमांवर लेख

तेजश्री शिंदे यांनी फेसबुक, ब्लॉगवर आजपर्यंत त्यांनी अनेक कविता तसेच विविध विषयांवरील समीक्षात्मक लेख लिहिले आहेत. त्यांच्या कवितांना नेटिझन्सकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असतो. त्यांची 'वाळवण' ही कविता तर समाजमाध्यमावर प्रचंड गाजली आहे. दिवाळी अंकातही त्यांच्या काही कविता प्रसिद्ध झाल्या आहेत.

सकाळ पु. पा. नं. २

# काँग्रेसचे जेल भरो आंदोलन

## राहुल गांधी यांच्या समर्थनार्थ कार्यकर्ते रस्त्यावर





विरार : वसई-विरार शहर काँग्रेसच्या वतीने राहुल गांधी यांच्या समर्थनार्थ जेल भरो आंदोलन केले.

विरार, ता. २५ (बातमीदार) : मोदी सरकार व भारतीय जनता पक्ष काँग्रेस नेते खासदार राहुल गांधी यांचा आवाज दाबण्याचा प्रयत्न करत आहे. भाजपने राहुल गांधी यांच्याविरोधात अनेक ठिकाणी खटले दाखल करून त्यांना अडकवण्याचे षड्यंत्र रचले आहे. गुजरातच्या सुरत कोर्टाने राहुल गांधी यांना दोन वर्षांची शिक्षा सुनावली आहे. भारतीय जनता पक्षाच्या या षड्यंत्राविरोधात तत्काळ काँग्रेस पक्षातर्फे जिल्हा, तालुका, ब्लॉक स्तरावर तीव्र आंदोलन करून जेल भरो करण्याच्या सूचना प्रांताध्यक्ष नाना पटोले यांनी दिल्या होत्या. त्यानुसार वसई-विरार शहर जिल्हा काँग्रेस पक्षाचे सर्व नेते, पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी आंदोलन केले. वसई-विरार शहर जिल्हा काँग्रेस कमिटी तर्फे वसई कोर्ट नाका (तहसीलदार कार्यालय) वसई येथून जिल्हा काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी मोर्चाने चालत जाऊन वसई पोलिस ठाणे येथे जेल भरो आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात जिल्हाध्यक्ष ओनिल आल्मेडा, जिल्हा कार्यालय सरचिटणीस किरण शिंदे, माणिकपूर ब्लॉक अध्यक्ष विल्फ्रेड डिसुझा, एस. सी. सेलचे जिल्हाध्यक्ष रामदास वाघमारे, व्हीजेएनटी जिल्हाध्यक्ष आनंद चव्हाण, किसान सेलचे जिल्हाध्यक्ष प्रिन्सली गोंसालवीस, महिला अध्यक्षा प्रविणा चौधरी, राधा अय्यर यांच्यासह काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

CS CamScanner
Scanned with CamScanner

सकाळ पा. न. ६

# बेकायदा मासेमारीवर 'तटरक्षक'चा वॉच?

## मत्स्यव्यवसाय विभागाचे मदतीसाठी तटरक्षक दलाला पत्र

भाईंदर, ता. २५ (बातमीदार) : पर्ससीन जाळ्या, एलईडी दिव्यांच्या मदतीने होत असलेल्या बेकायदा मासेमारीवर नियंत्रण आणण्यासाठी मत्स्यव्यवसाय विभागाने तटरक्षक दलाकडे मदत मागितली आहे. बेकायदा मासेमारीला आळा घालण्यासाठी पुरेशी यंत्रणा उपलब्ध नसल्याने पर्ससीन आणि एलईडी मासेमारी नौकांना प्रतिबंध करावा, असे पत्र मत्स्यव्यवसाय आयुक्तांनी तटरक्षक दलाला पाठवले आहे.



> पर्ससीन, एलईडी पद्धतीच्या मासेमारी नौकांना प्रतिबंध करावा, अशी विनंती मत्स्यव्यवसाय विभागाने तटरक्षक दलाला केली आहे. बेकायदा मासेमारीला आळा बसला, तर परंपरागत मासेमारी करणाऱ्या मच्छीमारांना दिलासा मिळेल.
> - बर्नड डिमेलो, कार्याध्यक्ष, अखिल महाराष्ट्र मच्छीमार कृती समिती

### आदेशाची अंमलबजावणी

पर्ससीन व एलईडी दिव्यांच्या मासेमारीवर मत्स्य व्यवसाय विभाग, पोलिस, भारतीय तटरक्षक दल, तसेच भारतीय नौदल यांनी संयुक्तपणे कारवाई करावी, असा निर्णय उच्च न्यायालयाने दिला आहे. या निर्णयाची अंमलबजावणी करण्यात यावी, अशी मागणी समितीने मत्स्यव्यवसाय विभागाच्या आयुक्तांकडे केली होती. त्यानुसार मत्स्यव्यवसाय आयुक्तांनी तटरक्षक दलाला पत्र लिहिले.

सागरी हद्दीत पर्ससीन जाळ्यांच्या वापरावर, तसेच एलईडी दिव्यांच्या मदतीने मासेमारी करण्यास केंद्र सरकारने बंदी घातली आहे. सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड, ठाणे आणि पालघर जिल्ह्यांच्या सागरी किनाऱ्यापासून बारा सागरी मैल अंतरात पर्ससीन आणि एलईडी दिव्यांच्या मासेमारीला मनाई आहे; मात्र त्यानंतरही समुद्रात बारा सागरी मैल अंतरापर्यंत, त्याच्या पलीकडेही पर्ससीन जाळ्या, तसेच एलईडी दिवे बसवलेल्या नौका मोठ्या प्रमाणात मासेमारी करत आहेत. या नौकांच्या दादागिरीमुळे स्थानिक मच्छीमारांना मासेमारी करणे अशक्य होते. अशा बेकायदा मासेमारीमुळे परंपरागत पद्धतीने मासेमारी करणारा मच्छीमार उद्ध्वस्त होण्याच्या मार्गावर आहे. त्यामुळे पर्ससीन आणि एलईडी दिव्यांच्या नौकांवर कठोर कारवाईची मागणी मच्छीमारांकडून सातत्याने केली जात आहे.

राज्य मत्स्यव्यवसाय विभागाकडून कारवाई सुरू असते; परंतु ती प्रभावी करण्यासाठी आवश्यक असलेली यंत्रणा विभागाकडे उपलब्ध नाही. त्यामुळे बेकायदा मासेमारी सुरू असल्याचे अखिल महाराष्ट्र मच्छीमार कृती समितीचे म्हणणे आहे. समितीचे अध्यक्ष देवेंद्र तांडेल, कार्याध्यक्ष बर्नड डिमेलो, सचिव संजय कोळी आदींनी नुकताच कोकण दौरा केला होता.

बारा सागरी मैलापर्यंत कारवाई करण्याचे अधिकार राज्य मत्स्यव्यवसाय विभागाला आहेत, परंतु त्यापलीकडच्या भागात पर्ससीन आणि एलईडी पद्धतीची मासेमारी सुरू असल्याचे दिसून येत आहे.

CS CamScanner

Scanned with CamScanner

पुढारी पा. म. २

# मिरा-भाईंदरमध्ये जीसीसी तत्त्वावर धावणार ई-बस

## पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी निर्णय; मे महिन्यात ५७ बसेस सेवेत दाखल होणार



**भाईंदर : राजू काळे**

पर्यावरणातील वायू प्रदूषण रोखण्यासाठी मिरा-भाईंदर महापालिकेला केंद्र शासनाने १५ व्या वित्त आयोगातून नॅशनल क्लिन एअर पॉलिसी (एनकॅप) कार्यक्रमांतर्गत सुमारे ८० कोटींहून अधिक निधी मंजूर केला आहे. त्यातून पालिकेने पर्यावरण पूरक ५७ ई-बस जीसीसी (ग्रॉस कॉस्ट कॉन्ट्रॅक्ट) तत्वावर चालविण्यासाठी एका खाजगी कंपनीची नियुक्ती केली आहे. या बस येत्या मे महिन्यात सेवेत दाखल होणार असल्याचे आयुक्त दिलीप ढोले यांनी सांगितले.

केंद्र शासनाने पालिकेला हवेतील धुळीचे प्रमाण रोखण्यासह वायू प्रदूषणावर नियंत्रण मिळविण्यासाठी राष्ट्रीय शुद्ध हवा कार्यक्रमांतर्गत सुमारे ८० कोटींहून अधिक निधी मंजूर केला आहे. या निधीतून पालिकेने प्रदूषणावर नियंत्रण मिळविण्यासाठी विविध यंत्रे खरेदी केली आहेत. मात्र ती अद्याप सुरु झाली नसली तरी येत्या काही दिवसांमध्ये ती सुरु करण्यात येतील, असा दावा प्रशासनाकडून करण्यात आला आहे. याचप्रमाणे एनकॅपमधून २८ कोटी १५ लाखांचा निधी पर्यावरण पूरक ५७ ई-बस साठी वापरण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यात सुमारे १ कोटी रुपये प्रती बसप्रमाणे ३२ मिडी, सुमारे १ कोटी ३० लाख रुपये प्रती बसप्रमाणे १५ साधारण व सुमारे १ कोटी ५० लाख रुपये प्रती बसप्रमाणे १० एसी ई-बसचा समावेश आहे. या बस जीसीसी तत्वावर चालविण्यात येणार असून त्यासाठी मेसर्स पिनाईकल मोबिलिटी सोल्युशन्स प्रा. लि. या खासगी कंपनीची नियुक्ती करण्यात आली आहे. या बस चालविण्यासाठी पालिका ठेकेदाराला प्रत्येक मिडी बसमागे ४६ रुपये, साधारण बसमागे ५४ रुपये व एसी बसमागे ५५ रुपये प्रती किलोमीटर प्रमाणे अदा करणार आहे. या बस येत्या मे महिन्यात परिवहन सेवेत दाखल होणार असून सध्या परिवहन सेवेत इंधनावर चालणाऱ्या ७४ बसचा ताफा असून त्यामध्ये ई-बसची भर पडून एकूण बसची संख्या १३१ इतकी होणार आहे. मात्र यातील इंधनावरील बस जीसीसी विथ व्हायेबल गॅप फंडिंग तत्वावर मेसर्स महालक्ष्मी इन्फ्रा एलएलपी या खाजगी कंपनीकडून चालविण्यात येत आहे. तर ई-बस जीसीसी तत्वावर चालविल्या जाणार असून या तत्वानुसार पालिका तिकिटाचे उत्पन्न वसूल करणार आहे.

### सध्या ८० हजार प्रवाशांची नोंद

पालिका या उत्पन्न संकलनासाठी खासगी एजन्सीची नियुक्ती करणार असून या उत्पन्नातून वाहक व निरीक्षकांचे वेतन अदा केले जाणार आहे. तर ठेकेदाराकडून बसची देखभाल, दुरुस्ती केली जाणार असून चालकाच्या वेतनासह विद्युत, इंधन आदींचा खर्च केला जाणार आहे. मात्र बसच्या अंतर्गत व बाह्य जाहिरातीचे दर वसूल करण्याची मुभा ठेकेदाराला देण्यात आली आहे. कंपनीला हे कंत्राट १२ वर्षांकरीता देण्यात येणार असून परिवहन सेवेत या ई -बस दाखल झाल्यास प्रवाशांकरीता अधिकाधिक मार्ग सुरू करता येणार आहे. सध्या या सेवेद्वारे प्रवास करणाऱ्या प्रवाशांची संख्या ८० हजारांवर गेल्याचे आयुक्तांकडून सांगण्यात आले.

1997 से
KAT खबरें आज तक
not a publication of the living media india group
वर्ष: 26 अंक-280 मुंबई, रविवार 26 मार्च 2023 पृष्ठ-12 मूल्य : 2.00

# महाठगो का पर्दाफाश : पहचान छिपाने के लिए झूठे नाम और पते का इस्तेमाल, दो गिरफ्तार

**वसई :** उसने शिकायतकर्ता के नाम से फर्जी दस्तावेज तैयार कर धोखाधड़ी कर विभिन्न बैंकों से लोन पर वाहन खरीदे इस आरोपी को एमबीवीवी पुलिस आयुक्तालय अंतर्गत क्राइम ब्रांच 03 की टीम ने पकड़ने में सफल रही, यह कार्रवाई डीसीपी ( क्राइम ) अविनाश अंबुरे व एसीपी अमोल मांडवे के मार्गदर्शन में क्राइम ब्रांच 03 (पी.आई) प्रमोद बड़ाख की टीम ने की है। यह जानकारी पुलिस अधिकारी ने शनिवार को दी है।पुलिस ने बताया कि, 21 दिसंबर 2022 से 11 फरवरी 2023 को प्राप्त शिकायतकर्ता बाबासाहेब लिंबराज ओव्हाल उम्र 39 वर्ष का एक अज्ञात आरोपी द्वारा फर्जी पैन कार्ड व आधार कार्ड बनाकर जिसके माध्यम से शिकायतकर्ता के नाम 1) मुथुट फिनकार्य, 2) एस आय फ्रेवा कॅपीटल,, 3) आईडीएफसी फर्स्ट बैंक , 4) कोटक प्राइम फाइनेंस, 5) एलएनटी फाइनेंस 6) मास फायनान्स इन विभिन्न फाइनेंस कंपनियों से 5,21,583/- की ठगी की, साथ ही ऋणदाता वित्त कंपनी ने शिकायतकर्ता के पैन कार्ड और आधार कार्ड को सत्यापित किए बिना ऋण देकर शिकायतकर्ता के साथ धोखाधड़ी की, इसलिय विरार थाने में कलम 420,465,468,471,34 के तहत एफआईआर दर्ज किया गया।पुलिस के मुताबिक, पुलिस उपायुक्त ( अपराध ) व सहायक पुलिस आयुक्त ( अपराध ) द्वारा दिये गये निर्देश एवं आदेशानुसार अपराध शाखा द्वारा उक्त अपराध की समानांतर जाँच प्रारम्भ की गयी, हालांकि, प्रारंभिक जांच के दौरान, अपराध के आरोपियों ने अपनी पहचान छिपाने के लिए झूठे नाम और पते का इस्तेमाल किया था, जिससे उनका पता लगाना मुश्किल हो गया था। लेकिन, लगातार फालोअप के बाद उनके तकनीकी विश्लेषण और गोपनीय मुखबिरों व प्राप्त जानकारी के माध्यम से अपराध के आरोपियों की तलाश की गई व आरोपी संजय बाला परब (44) व मुस्ताक युसुफ बोहरा (50) को हिरासत में लिया गया।उक्त आरोपी अपने अन्य साथियों से मिलीभगत कर विभिन्न नामों के नाम पर जाली दस्तावेजों का प्रयोग कर विभिन्न वित्तीय कंपनियों से 6,30,000 रुपये के ऋण पर खरीदी गई विभिन्न कंपनियों की 9 मोटरसाइकिलें जब्त की गई हैं।आरोपी का विरार थाने में इस अपराध के तहत धारा 420, 465, 468, 471.34 को वर्गीकृत किया गया है।



Scanned with CamScanner

दैनिक दबंग दुनिया
निष्पक्ष नज़र, निष्पक्ष खबर

# फर्जी दस्तावेज तैयार कर धोखाधड़ी कर विभिन्न बैंकों से लोन पर वाहन खरीदने वाले ठग गिरफ्तार, 9 मोटरसाइकिल साइकिल जप्त

दबंग रिपोर्टर » वसई




उसने शिकायतकर्ता के नाम से फर्जी दस्तावेज तैयार कर धोखाधड़ी कर विभिन्न बैंकों से लोन पर वाहन खरीद इस आरोपी को एमबीवीवी पुलिस आयुक्तालय अंतर्गत क्राइम ब्रांच 03 की टीम ने पकड़ने में सफल रही,यह कार्रवाई डीसीपी ( क्राइम ) अविनाश अंबुरे व एसीपी अमोल मांडवे के मार्गदर्शन में क्राइम ब्रांच 03 (पी.आई) प्रमोद बड़ाख की टीम ने की है। यह जानकारी पुलिस अधिकारी ने शनिवार को दी है।पुलिस ने बताया कि,21 दिसंबर 2022 से 11 फरवरी 2023 को प्राप्त शिकायतकर्ता बाबासाहेब लिंबराज ओव्हाल उम्र 39 वर्ष का एक अज्ञात आरोपी द्वारा फर्जी पैन कार्ड व आधार कार्ड बनाकर जिसके माध्यम से शिकायतकर्ता के नाम 1) मुथुट फिनकार्य, 2) एस आय फ्रेवा कॅपीटल,, 3) आईडीएफसी फर्स्ट बैंक , 4) कोटक प्राइम फाइनेंस, 5) एलएनटी फाइनेंस 6) मास फायनान्स इन विभिन्न फाइनेंस कंपनियों से 5,21,583/- की ठगी की,साथ ही ऋणदाता वित्त कंपनी ने शिकायतकर्ता के पैन कार्ड और आधार कार्ड को सत्यापित किए बिना ऋण देकर शिकायतकर्ता के साथ धोखाधड़ी की,इसलिय विरार थाने में कलम 420,465,468,471,34 के तहत एफआईआर दर्ज किया गया।पुलिस के मुताबिक,पुलिस उपायुक्त ( अपराध ) व सहायक पुलिस आयुक्त ( अपराध ) द्वारा दिये गये निर्देश एवं आदेशानुसार अपराध शाखा द्वारा उक्त अपराध की समानांतर जाँच प्रारम्भ की गयी,हालांकि, प्रारंभिक जांच के दौरान,अपराध के आरोपियों ने अपनी पहचान छिपाने के लिए झूठे नाम और पते का इस्तेमाल किया था,जिससे उनका पता लगाना मुश्किल हो गया था। लेकिन,लगातार फालोअप के बाद उनके तकनीकी विश्लेषण और गोपनीय मुखबिरों व प्राप्त जानकारी के माध्यम से अपराध के आरोपियों की तलाश की गई व आरोपी संजय वाला परब (44) व मुस्ताक युसुफ वोहरा (50) को हिरासत में लिया गया।उक्त आरोपी अपने अन्य साथियों से मिलीभगत कर विभिन्न नामों के नाम पर जाली दस्तावेजों का प्रयोग कर विभिन्न वित्तीय कंपनियों से 6,30,000 रुपये के ऋण पर खरीदी गई विभिन्न कंपनियों की 9 मोटरसाइकिलें जब्त की गई हैं।आरोपी का विरार थाने में इस अपराध के तहत धारा 420, 465, 468, 471 34 को वर्गीकृत किया गया है।

Scanned with CamScanner

समय भास्कर

# क्लासेस पर मालिकाना हक़ को लेकर हुआ विवाद, मारपीट मे आरोपी हुए गिरफ्तार

संवाददाता/ मीरा-भाईदर

मीरा-भाईदर में क्लासेस पर मालिकाना हक़ को लेकर दो गुटों में विवाद हो गया, और यह विवाद मार-पीट तक पहुंच गई, आपको बता दे बीते दिन यह घटना एस आर क्लासेस,फर्स्ट फ्लोर, अमित टावर,गुरुद्वारा गली, नवघर रोड भायंदर ईस्ट में घटित हुई।

पंकज सिंह ने इस संदर्भ मे नवघर पुलिस स्टेशन में शिकायत दर्ज कराई और पुलिस ने इस मारपीट के मामले मे दो आरोपी लक्की रॉय और विवेक रॉय को गिरफ्तार कर न्यायालय में पेश किया जहां से उन्हें न्यायिक हिरासत में भेज दिया गया है। पुलिस स्टेशन में पंकज सिंग द्वारा दर्ज कराई गई शिकायत के मुताबिक सन 2000 के आस पास साझेदारी में शुरू किए गए एस आर क्लासेस के स्वामित्व को लेकर पंकज सिंग का अन्य साझेदारों विवेक योगेंद्रनाथ राय, पूर्णेदु (लक्की) योगेंद्रनाथ राय और सिद्धार्थ सांघवी के बीच पिछले काफी समय से विवाद चल रहा है। पिछले दिनों पंकज सिंह अपने भाई प्रवीण सिंह तथा एक मित्र राम सिंह के साथ संपत्ति की वर्तमान स्थिति की जांच करने के लिए गए थे, क्योंकि वे धारा 11 के तहत उच्च न्यायालय में फाईल करने के लिए मसौदा तैयार कर रहे थे । पंकज सिंह ने बताया कि पूर्व नियोजित तरीके से उन पर हमला हुआ जिससे उनके दाहिने हाथ पर गंभीर चोट आई है, उन्होंने कहा कि इसके पहले भी उन्हें मारपीट की धमकियां मिल चुकी थी मिली जानकारी के मुताबिक वर्ष 2018 में भी इसी तरह मारपीट का मामला राय बंधुओं के विरूद्ध मीरा रोड पुलिस स्टेशन में दर्ज हुआ था, और उन्हें गिरफ्तार किया गया था

Scanned with CamScanner

लोकमत

# बनावट कागदपत्रांद्वारे वाहने खरेदी करून फसवणूक

## दुकलीला अटक; गुन्हे शाखा युनिट-३ चे यश

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : फिर्यादीचे बनावट कागदपत्र तयार करून विविध बँकेतून कर्ज घेऊन वाहने खरेदी करून फसवणूक करणाऱ्या दोन आरोपींना अटक करण्यात गुन्हे शाखा युनिट तीनच्या पोलिसांना यश मिळाले आहे. पोलिसांनी आरोपींकडून नऊ दुचाकी हस्तगत केल्याची माहिती जनसंपर्क अधिकारी विशाल धायगुडे यांनी शनिवारी दिली.

२१ डिसेंबर ते ११ फेब्रुवारी २०२३ दरम्यान बाबासाहेब लिंबराज ओव्हाळ (वय ३९) यांच्या नावाचे आरोपीने बनावट पॅनकार्ड, आधारकार्ड बनवून त्यांच्या नावे मुथुट फिनकार्प, एस. आय. क्रेवा कॅपिटल, आयडीएफसी फस्ट बँक, कोटक प्राइम फायनान्स, एलएनटी फायनान्स आणि मास फायनान्स या विविध फायनान्स कंपन्यांमधुन ५ लाख २१ हजार ५८३ रुपयांचे कर्ज काढून फसवणूक केली होती. विरार पोलिसांनी विविध कलमान्वये ११ फेब्रुवारीला गुन्हा दाखल केला होता. या फसवणुकीच्या गुन्ह्यांची वरिष्ठांनी गांभीर्याने दखल घेऊन आरोपीचा शोध घेत गुन्हे उघडकीस आणण्याच्या सूचना व मार्गदर्शन केले होते. दाखल गुन्ह्याचा समांतर तपास गुन्हे शाखा युनिट तीनने सुरू केला. प्राथमिक तपासादरम्यान आरोपीने स्वतःची ओळख लपविण्यासाठी खोटे नाव व पत्ते वापरल्याने त्यांचा शोध घेणे क्लिष्ट झाले होते.

### नऊ दुचाकी हस्तगत

- गुन्हे शाखेचे अधिकारी व अंमलदार यांनी सतत पाठपुरावा करून गुप्त बातमीदार व तांत्रिक विश्लेषणाद्वारे आरोपी संजय बाळा परब (वय ४४) आणि मोहम्मद मुस्ताक युसुफ वोहरा (५०) या दोघांना ताब्यात घेतले.
- तपास केल्यावर आरोपींनी त्यांचे इतर साथीदारासोबत आपसांत संगनमत करून हा गुन्हा केल्याचे निष्पन्न झाले. अटक आरोपी यांच्याकडे अधिक तपास करून त्यांनी वेगवेगळ्या व्यक्तींच्या नावे बनावट कागदपत्रांचा वापर करून विविध फायनान्स कंपन्यांमधून कर्ज घेऊन एकूण ६ लाख ३० हजार रुपये किमतीच्या विविध कंपनीच्या नऊ दुचाकी हस्तगत करण्यात आल्या आहेत.

बातमीदार, तांत्रिक विश्लेषणाद्वारे दोघांना अटक केली. तर या गुन्ह्याचा पुढील तपास विरारचे सहायक पोलिस निरीक्षक प्रवीण भोसले हे करीत आहेत.

ही कामगिरी पोलिस उप-आयुक्त, (गुन्हे) अविनाश अंबुरे, सहा. पोलिस आयुक्त अमोल मांडवे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक प्रमोद बडाख, पोलिस उपनिरीक्षक उमेश भागवत, शिवाजी खाडे, पोलिस हवालदार अशोक पाटील, मुकेश तटकरे, शंकर शिंदे, सचिन घेरे, सागर बारवकर, मनोज सकपाळ, अश्विन पाटील, राकेश पवार, सुमित जाधव, प्रवीण वानखेडे, सागर सोनवणे, गणेश यादव, संतोष चव्हाण यांनी उत्कृष्टरीत्या पार पाडली आहे.



Scanned with CamScanner

लोकमत

# सर्वोत्कृष्ट तपासासाठी पोलिसांचा सन्मान

## दर महिन्याला उपक्रम : पोलिस आयुक्त मधुकर पांडेय यांच्या हस्ते केला सत्कार

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : मीरा- भाईंदर, वसई-विरार पोलिस आयुक्तालयात फेब्रुवारी महिन्यातील ५३ वाहने चोरी करणारी टोळी जेरबंद करून २२ गुन्ह्यांची उकल, ब्रीजखाली डोक्यात दगड मारून हत्या करणाऱ्या आरोपीला २४ तासांत जेरबंद, लिव्ह इन रिलेशनशिपमध्ये हत्या करून पळालेल्या प्रियकराला अटक, १५७ नागरिकांची करोडो रुपयांची फसवणूक करणारी टोळी, इन्स्टाग्राम आयडीवरून मुलीसोबत लैंगिक छळ करणाऱ्या आरोपीला अटक आणि चोरीचे ५३ मोबाइल हस्तगत केले. या गुन्ह्यांची उकल करणाऱ्या पोलिस निरीक्षकांना शुक्रवारी पोलिस आयुक्तांच्या हस्ते सर्वोत्कृष्ट तपासाचे प्रशस्तीपत्रक आणि सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. आयुक्तालयातर्फे दर महिन्याला सर्वोत्कृष्ट तपास करणाऱ्या पोलिसांचा सन्मान करण्यात येतो.



पो.नि. प्रमोद बडाख यांचा सत्कार केला.



पो.नि. शाहूराज रणवरे यांचा सत्कार केला.

१ गुन्हे शाखेच्या युनिट तीनच्या पथकाने पोलिस निरीक्षक प्रमोद बडाख यांच्या मार्गदर्शनाखाली बँकांनी सील केलेल्या मालमत्ता/घरे स्वस्त दरात तडजोडीने मिळवून देण्याचा बहाणा करून सर्वसामान्य १५७ नागरिकांची तीन कोटी ७५ लाखांची फसवणूक करणाऱ्या चौघांच्या टोळीला गजाआड केले आहे.

२ काशीमिरातील पीडित मुलीला वेगवेगळ्या इन्स्टाग्राम आयडीवरून लैंगिक छळप्रकरणी गुन्हा दाखल केला होता. पो. नि. सुजितकुमार गुंजकर यांच्या टीमने उकल केली.

३ मध्यवर्ती गुन्हे शाखेच्या पथकाने तांत्रिक विश्लेषण करून पोलिस आयुक्तालय, ठाणे, मुंबई येथील ५३ मोबाइल हस्तगत केल्याने पोलिस निरीक्षक राहुल राख यांना प्रशस्तीपत्र दिले आहे.

४ सीता सदन इमारतीत मेघा शहा या महिलेचा बेडमध्ये ठेवलेला कुजलेला मृतदेह आढळला होता. गुन्हे शाखा युनिट दोनचे पोलिस निरीक्षक शाहूराज रणवरे यांच्या टीमने आरोपी पती पळून जाण्याच्या तयारीत असताना धावत्या ट्रेनमधून ताब्यात घेतले होते. आरोपी पती व पत्नी लिव्ह इन रिलेशनशिपमध्ये राहत होते. दोघांमध्ये नेहमी वाद होऊन भांडण होत असल्याने पतीने तिची हत्या केली होती.

साडे चार करोड रुपये किमतीची ५३ वाहने जप्त करून दोन आरोपींना अटक करत २२ गुन्ह्यांची उकल गुन्हे शाखेच्या युनिट एकचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक अविराज कुऱ्हाडे आणि त्यांच्या पथकाने केली. तुळींज ओव्हर ब्रीजच्या खाली २५ फेब्रुवारीच्या रात्री सिमेंटचा दगड डोक्यात घालून मित्राची हत्या केली होती. तुळींज पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक शैलेंद्र नगरकर यांच्या मार्गदर्शनाखाली आरोपी मित्राला तुळींजच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेतील पोलिसांनी २४ तासांत अटक केली होती. या सर्वांना मधुकर पांडेय यांच्या हस्ते गौरविले.



Scanned with CamScanner


देवी स्कंदमाता की पूजा आज
NBT
संडे नवभारत टाइम्स
घायल होने के बावजूद शूट पर लौटेंगे महानायक ▸p10


# ₹10 लाख की कोकीन जब्त, नाइजीरियन आरोपी अरेस्ट

■ **निसं, नालासोपाराः** तुलिंज पुलिस ने नालासोपारा पूर्व स्थित मोरेगांव इलाके से दस लाख रुपये मूल्य की कोकीन के साथ एक नाइजीरियन को गिरफ्तार किया है। आरोपी के पास से 104 ग्राम कोकीन बरामद हुई है। पिछले सप्ताह तुलिंज पुलिस ने 9 लाख रुपये मूल्य की ड्रग्स के साथ एक महिला को गिरफ्तार किया था। तुलिंज पुलिस स्टेशन के बीट मार्शल पांडुरंग विठ्ठल सगले की सूचना पर सीनियर पीआई शैलेंद्र नगरकर के मार्गदर्शन में पुलिस टीम ने आरोपी ओके चिमा गेवरिल एगु (54 वर्ष) को अरेस्ट कर लिया।

Scanned with CamScanner

लोकमत



वाहन खरेदीत फसवणूक करणाऱ्या दोन आरोपींना अटक करण्याची यशस्वी कामगिरी गुन्हे शाखा युनिट तीनच्या पोलिसांनी केली आहे.

Hello Vasai
Page No. 1 Mar 26, 2023
Powered by: erelego.com

Scanned with CamScanner

# चालक-पोलीस शिपाई भरती लेखी परीक्षा संपन्न

भाईंदर - मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाच्या कार्यालयामध्ये रविवारी सकाळी ९ ते १०.३० या वेळेत चालक-पोलीस शीपाई लेखी परीक्षा घेण्यात आली आहे.

चालक-पोलीस शिपाई भरती लेखी परीक्षेसाठी पात्र ठरलेल्या १०४ उमेदवारांपैकी परीक्षेसाठी ९९ उमेदवार हजर होते. विद्यार्थ्यांना लेखी परीक्षेबाबत सूचना देण्यात आल्या होत्या. लेखी परीक्षा ही व्हेरिफिकेशन, बायोमेट्रिक, फ्रीस्किंग, सीसीटीव्ही, व्हिडीओ ग्राफी, उचित बंदोबस्तासह पारदर्शकपणे घेण्यात आली असल्याची माहिती पोलीस आयुक्तालयाच्या मार्फत देण्यात आली आहे. लेखी परीक्षेच्या पोलीस बंदोबस्तसाठी वरिष्ठ अधिकारी तसेच ७ पोलीस निरीक्षक, २२ सहाय्यक पोलीस निरीक्षक, ४२ पोलीस अंमलदार हे कर्तव्यावर हजर होते.

लेखी परीक्षेसाठी पात्र ठरलेल्या

महाआयटी विभागामार्फत ऑनलाइन पद्धतीने डाऊनलोड करण्यासाठी उपलब्ध होते. पोलीस शिपाई-चालक लेखी परीक्षेसाठी पात्र असलेल्या उमेदवारांनी रविवारी सकाळी ०६:३० ला परीक्षेसाठी हजर राहण्यास सांगण्यात आले होते. आयुक्तालयाकडून पाण्याची बॉटल व बिस्कीटचा पुडा देण्यात आला होता. आयुक्तालयाच्या मार्फत पोलीस शिपाई व चालक भरती लेखी परीक्षा पारदर्शकपणे पार पाडण्याकरिता सर्व स्तरावर विशेष उपाय-योजना करण्यात आल्या होत्या. मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाच्या अंतर्गत सुरू असलेल्या पोलीस शिपाई व चालक पदाच्या प्रक्रियेमध्ये शारीरिक चाचणी व कौशल्य चाचणीमधून लेखी परीक्षेसाठी १२,१२४ उमेदवार पोलीस शिपाई लेखीसाठी पात्र असून, १०४ उमेदवार चालक-पोलीस शिपाई लेखी परीक्षेसाठी पात्र ठरले आहेत. पात्र उमेदवारांनी लेखी परीक्षेकरिता येताना कोणत्या गोष्टी सोबत

वेळी सोबत बाळगता येणार नाहीत याबाबत उमेदवारांना माहिती देण्यात आली होती. उमेदवारांनी वेळेवर परीक्षेच्या ठिकाणी हजर राहणे बंधनकारक होते. उमेदवारांना पॅड व काळ्या शाईचे पेन परीक्षेवेळी कार्यालयाकडून पुरवण्यात आले होते. त्यामुळे कागदपत्रांव्यतिरिक्त इतर कोणतेही साहित्य परीक्षा केंद्रावर आणण्यास मनाई होती. उमेदवारांनी मोबाइल, स्मार्ट वॉच, इतर कोणतेही ब्लुटुथ यंत्र जवळ बाळगण्यास सक्त मनाई करण्यात आली होती. तसे निदर्शनास आल्यास अथवा उमेदवार इतर कोणत्याही बेकायदेशीर मार्गाचा वापर करत असल्याचे निदर्शनास आल्यास त्याच्यावर कायदेशीर कारवाई केली जाईल व संबंधित उमेदवारास पुढील पोलीस भरती प्रक्रियेतून तत्काळ बाद केले जाणार आहे, अशा प्रकारच्या सूचना उमेदवारांसाठी देण्यात आल्या होत्या. लेखी परीक्षा उचित बंदोबस्तासह पारदर्शकपणे घेण्यात आली

Scanned with CamScanner